**प्रेस नोट दिनांक ३०/०३/२०१९**

**उत्तमनगर पोलीस ठाणे पुणे शहर**

**मोबाईल चोरास शिताफिने अटक केले बाबत.**

तक्रारदार श्री.धनंजय हिरालाल माळी रा.फ्लॅट नं.२ स्वामी कृपा बिल्डींग गुरुप्रसाद कॉलनी शाहू कॉलनी लेन १ कर्वेनगर पुणे हे त्यांचे मित्रांसमवेत रहात असून दिनांक २८/३/२०१९ रोजी सकाळी रात्री उशीरा झोपल्याने सकाळी उशीरापर्यंत झोपले होते. त्यावेळी त्यांचा मित्र कामास जाताना नेहमी प्रमाणे फ्लॅटचा दरवाजा उघडा ठेवून गेला होता. त्यावेळी कोणीतरी फिर्यादींचे २,०६०/- रुपये रोख, आधार कार्ड व मतदान कार्ड असलेले पाकीट व ७,०००/-रुपये किंचा मोबाईल चोरुन नेला असलेबाबत तक्रारदार उठल्यानंतर त्यांना समजून आले. त्यांनी लागलीच मोबाईलवर फोन केला असता त्याची रिंग वाजत होती. परंतू तो उचलला नाही. त्यांनी बिल्डींगचे सीसीटिव्ही फूटेज तपासले. त्यावेळी त्यांना सकाळी १०/१७ वाजता एक अनोळखी मुलगा वरील पाकीट व मोबाईल चोरी करुन जात असताना दिसला. त्यामुळे तक्रारदार यांनी मोबाईलचा शोध घेण्यासाठी गुगलवर फाईंड माय डिव्हाईस लोकेशन सर्च केले असता त्यांना मोबाईल शिवणे व उत्तमनगर पुणे परिसरात असल्याचे समजून आल्याने त्यांनी उत्तमनगर पोलीस ठाण्यास तक्रार दिली.ती उत्तमनगर पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्रमांक ३६/२०१९ भा.दं.वि.क.३८० प्रमाणे नोंद करण्यात आली.

वरील गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक, ए.एल घोडके यांचेकडे देण्यात आला असता त्यांनी त्यांचे स्टाफचे मदतीने वरील बाबत माहिती घेवून आरोपी रजत सुनिल वाल्मीकी,वय-२० वर्षे रा. कोंढवे धावडे पुणे यास दिनांक २८/३/२०१९ रोजी रात्रौ २०.३० वाजता शिताफिने अटक करुन, त्यांचेकडून गुन्हयात चोरीस गेला माल २,०६०/- रुपये रोख, आधार कार्ड व मतदान कार्ड असलेले पाकीट व ७०००/- रुपये किं.चा मोबाईल हस्तगत केला आहे.